# छोटा गंधर्व --नाट्यसंगीतातील अत्यंत गोड आवाज

नाट्यसंगीत हा मराठी संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे आणि त्याच्यावर कितीही संकटे आली तरी तो अधूनमधून डोक वर काढत असतो. त्याचं मुख्य कारण म्हणजे मराठी माणसाचं त्याच्यावर जीवापाड प्रेम. "कट्यार काळजात घुसली" हे नाटक पुरषोत्तम दारव्हेकरानी बऱ्याच वर्षांपूर्वी लिहिले पण त्याच्याबद्दलची ओढ अजून कमी होत नाही, किंबहुना त्याचं सिनेमात रुपांतर पाहण्यासाठी महाराष्ट्रात व अमेरिकेत लोकांनी एवढी गर्दी केली की तो एक उच्चांक आहे असं म्हणाव लागेल. नाटकाचे कथानक, सचिन पिळगावकर यांचा अभिनय व राहुल देशपांडे आणि महेश काळे यांच्या गाण्यांनी नाट्यसंगीत पुन्हा एकदा प्रकाशात येवू लागले आहे. नाट्यसंगीताच्या इतिहासाकडे पाहिले तर ही १९४०-१९४५ च्या परिस्थितीची पुनरावृत्ती आहे अस वाटते. सिनेमा ह्या त्यावेळच्या मनोरंजनाच्या नवीन माध्यमाने लोकांच्या मनाची एकदम पकड घेतली. १९०५ ते १९४५ काळ जरी बालगंधर्वांनी आपल्या अभिनयाने आणि गाण्याने गाजवला तरी मराठी नाट्य संगीतावर सिनेमा व त्यातील पार्श्वसंगीताचा परिणाम होवून मराठी नाटके पाठी पडू लागली.

अशा परिस्थितीत मराठी नाटक आणि विशेषतः त्यातील संगीत जिवंत ठेवणं ही साधीसुधी गोष्ट नव्हती. ती उल्लेखनीय कामगिरी छोटा गंधर्वनी केली. त्यांच्या अद्वितीय गोड आवाजामुळे त्यांनी नाट्यसंगीत १९४० ते १९८० या काळात पुन्हा एकदा उभं केल. याचं श्रेय त्यांच्या अतिशय गोड आणि लडिवाळ गाण्याच्या शैलीत सापडते. सौदागर नागनाथ गोरे उर्फ छोटा गंधर्व यांचा जन्म १८ मार्च १९१८ साली कोरेगाव, सातारा इथे झाला. अगदी लहानपणी त्यांनी दामुअण्णा जोशी यांच्या बालमोहन नाटक मंडळीत शिरकाव केला व १९२८ सालीते पुण्यात प्रथम रंगमंचावर आले. त्या वयातसुद्धा त्यांच्या अवर्णनीय गोड आवाजाने लोकांच्या मनाची पकड लवकरच घेतली. दामुअण्णा तेंव्हापासून त्यांना आवडीने छोटा गंधर्व म्हणू लागले. बालमोहन नाटक मंडळीत असताना प्रथम दत्तुबुवा बागलकोट व नंतर नरहरबुवा पाटणकर, सवाई गंधर्व, भुर्जी खान यांसारख्या मात्तबर गवयांची तालीम त्यांना लाभली. पतियाळा घराण्याचे उस्ताद शेंडे खाननी त्यांना बऱ्याच अप्रचलित रागातल्या चीजा शिकवल्या असं नमूद केलं गेलं आहे. सुरवातीला ते स्त्रीपात्रांची कामं करायचे पण १९३४ पासून त्यांचा आवाज फुटल्यानंतर ते पुरूषपात्रांत चमकू लागले. अत्रे यांच्या "घराबाहेर"-१९३४, "उद्याचा संसार"-१९३६ व "लग्नाची बेडी"--१९३६ या नाटकांत त्यांच्या भूमिका चांगल्याच रंगल्या. त्या तरूण वयात ते एक उदयोन्मुख नाट्यसंगीत गाणारे म्हणून लोकांच्या समोर आले,

१९४०-४५ नंतर बालगंधर्वांचं गाणं जसं ओसरत चाललं तसा छोटा गंधर्वांचा नाट्यक्षेत्रात ठसा उमटायला लागला. १९४३ साली त्यांनी बालमोहन नाटक मंडळी सोडली व कला विकास मंडळ ही

स्वतःची संस्था स्थापन केली, त्या नावाखाली "मैलाचा दगड" "फुलपाखरे " "गुणी बाळे " ही नाटकं सादर केली. परंतु ना. ग. जोशी लिखित "देवमाणूस" हे त्यांचं नाटक विशेष गाजलं. याचं मुख्य कारण त्यांनी स्वतः लिहिलेली नाट्यगीतं. "दिलरुबा मधुर हा दिलाचा", "चांद माझा हा हासरा", "सुखवी तया संसारा" व "छळी जीवा दैव गती" यानी लोकप्रियतेचा जणु काय कळस गाठला! याचा पुरावा म्हणजे ही गाणी  विसाव्या शतकाच्या दुसऱ्या ५० वर्षांत रेडिओवर लोक सतत ऐकत होती. लवकरच त्यांनी संगीत नाटकं "मानापमान", "सौभद्र", "मृच्छकटिक" आणि "संशय कल्लोळ " यांत प्रमुख भूमिका करून मराठी रंगमंच १९४३ ते १९७८ म्हणजे ३५ वर्षे गाजवला. "मानापमाना"तील  'चंद्रिका ही जणू', 'प्रेम सेवा शरण' व 'प्रेम भावे जीव जगिया' ही गाणी घरोघरी प्रसिध्द झाली आणि अजूनसुद्धा गाणारे त्यांच्या पद्धतीने ती गाणी मेहफिलीत सादर करतात. १९६० साली त्यांनी "सुवर्णतुला"  या नाटकाचं संगीत दिग्दर्शन केलं. ते इथेच थांबले नाहीत तर त्यांनी "पठ्ठे बापूराव", "रंगल्या रात्री अशा" व "पुढारी" या बोलपटात पार्श्वगायन केलं. १९७८ साली रंगमंचाला रामराम म्हटल्यावर त्यांनी हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतावर लक्ष केंद्रित केल व बसंती-केदार, नंद-बसंत, गुणी-कौन्स, मालती-कौन्स, भुवनेश्वरी असे राग तयार केले. याशिवाय त्यांनी कर्नाटक संगीतात वाचस्पती, वगधीश्वरी व जनसंमोहिनी  असेही राग निर्माण केले. ते शेवटी पुण्यात स्थाईक झाले आणि बालगंधर्व रसिक मंडळ व भारत गायन समाज या दोन संस्थांशी बरीच वर्षे निगडीत होते. त्यांना अनेक पुरस्कारांनी भूषविले गेले होते, त्यांत विष्णुदास भावे पुरस्कार (१९८०) संगीत नाटक अकादमी व महाराष्ट्र गौरव पुरस्कार (१९९०) हे पुरस्कार मुख्य होते. बालगंधर्वांनंतर रंगमंचावरचे हे अद्वितीय गोड गळ्याचे नाट्यगीत गाणारे व संगीतकार रत्न १९९७ साली इहलोक सोडून गेले.

२३ फेब्रुवारी १९८० रोजी ६० व्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांनी नाट्यसंगीताच्या संदर्भात जे उद्गार काढले ते लक्षात ठेवण्यासारखे आहेत. ते मी इथे उधृत करत आहे. "हल्लीची संगीत नाटके यशस्वी होत नाहीत असे मी म्हणायला तयार नाही. पूर्वीच्या संगीत नाटकाइतके हल्लीची संगीत नाटकातले संगीत नाट्य कथानकाशी एकजीव झालेले आढळत नाही. पूर्वी संगीतनाटक हा जणू सलग शब्द होता.  संगीत आणि नाटक असे आपण म्हणत नाही. पण हल्ली मात्र संगीत आणि नाटक असे म्हणावे लागते. नाटकाशी संगीत एकजीव होणे म्हणजे काय ? असा प्रश्न विचारला जाईल. जेंव्हा स्वरांनीही कथानक सांगताना दिसते, तेंव्हा संगीत नाटकाशी एकरूप झालेले असते. नाटकाशी संगीत एकजीव होण्यासाठी नाटकातील पदांची स्थाने योग्य असावी लागतात. योग्य जागी पदे घालण्याची कला सर्वात उत्कृष्ट खाडिलकरांनाच साधली होती...... "नभ मेघांनी आक्रमिले" ह्या पदातील विजेचा कडकडाट प्रत्यक्ष रंगभूमीवर दाखवण्याची आवश्यकता नाही. समर्थ नट आपल्या स्वरांनी आणि तानेच्या कडकडाटाने विजेचा आभास निर्माण करू शकेल. ... मला जुन्याचे प्रेम आणि नव्याचे आकर्षण आहे. तरीही असे म्हणावेसे वाटते की जुने ते जुनेच राहुद्या. दुसरे नवे जरूर करा. पण जुन्याला नवं बनवू नका. त्याला आधुनिक  "टच"  देवू नका.  "प्रिये पहा"

या गाण्याच्या वेळी प्रत्यक्ष सूर्य उगवल्याचे दृश्य रंगभूमीवर दाखवू नका. नटाच्या स्वरात तितकी ताकद असेल तर तो  आपल्या स्वरांनी सूर्योदयाचा भास नक्की निर्माण करेल. शेवटी, गाणे--मग ते नाटकातले असो की कोणतेही असो--ते गोडच असायला पाहिजे. जे गोड नाही ते गाणेच नाही. जशी साखर ही गोडच पाहिजे तरच तिला साखर ही संज्ञा प्राप्त होते. मुखाशी आणि कानाशी ज्या गोष्टींचा संबंध येतो त्या गोष्टी गोडच हव्यात !”

**पं. सुजन राणे**

(न्यू जर्सी, USA)

Email: panditsujanrane@gmail.com